# ओबीसींचा आवाज दाबला तर महाराष्ट्र पेटेल!

बीड ● रविवार, दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ ● वर्ष २० वे ● पाने ४
http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email: beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# एकीकडे जरांगे पाटील तर दुसरीकडे ओबीसी समाजही स्वतःच्या हक्कासाठी पेटून उठल्याने सरकारवर वाढला दबाव

- ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी जेजुरी गडावरून ओबीसींच्या नव्या लढ्याची तळी उचलण्याचा व्यक्त केला निर्धार
- ओबीसींच्या अस्तित्वाचा, सन्मानाचा आणि अधिकाराचा प्रश्न टोकाला गेल्याचे लक्ष्मण हाके यांनी सांगितले ठणकावून!
- राज्यभरातील समाज बांधवांनो जेजुरी गडावर या, हा लढा एकत्र सुरू करूया, हाके यांनी केले भावनिक आवाहन

## प्रा. हाके यांनी जेजुरीमधून आंदोलनाची हाक दिल्याने ओबीसी तरुण, महिला, नेते गडावर दाखल

**जेजुरी : राज्यातील ओबीसी राजकारण पुन्हा पेट घेण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत मुख्यमंत्र्यांचे ओबीसी नेत्यांच्या बैठकीला स्वत :ला बोलावले गेले नाही. या कारणावरून ओबीसी नेते लक्ष्मण हाके संतप्त झाले असून त्यांनी आज जेजुरीमधून आंदोलनाचे हाक दिली आहे. ओबीसींच्या अस्तित्वाचा, सन्मानाचा आणि अधिकाराचा प्रश्न आता टोकाला गेला आहे, असे ठणकावून सांगत हाके यांनी जेजुरी गडावरून ओबीसींच्या नव्या लढ्याची तळी उचलण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. राज्यभरातील समाज बांधवांना त्यांनी जेजुरी गडावर या, हा लढा एकत्र सुरु करूया, असे भावनिक आवाहन केले.**



### आता ओबीसी एकत्र येणार!

● मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात या आंदोलनाला जोरदार प्रतिसाद मिळू लागला आहे . परभणी, बीड, लातूर, छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातून समाज बांधवांनी जेजुरी गडावर चला असा नारा दिला आहे . अनेक युवक संघटनांनी हाके यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे . सरकारने ओबीसींना चर्चे बाहेर ठेवून मोठी चूक केली, अशी टीका स्थानिक नेत्यांकडून केली जात आहे . दरम्यान सरकार आता मध्यस्थींच्या प्रयत्नात असून गृह विभाग आणि सामाजिक न्याय विभागाचे वरिष्ठ अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत . मात्र, हाके यांच्या आंदोलनाला किती मोठा प्रसाद मिळतो आणि राज्य सरकारची भूमिका काय राहते यावर पुढील घडामोडी अवलंबून राहणार आहेत .

## लक्ष्मण हाके यांना आमंत्रण न दिल्याने ओबीसी समाजातील अनेक गटात नाराजी

● मुंबईत नुकतीच मुख्यमंत्र्यांच्या उपस्थित ओबीसी नेत्यांची बैठक झाली मात्र या बैठकीला लक्ष्मण हाके यांना आमंत्रण देण्यात आले नाही . त्यामुळे ओबीसी समाजातील अनेक गटांमध्ये नाराजी पसरली आहे . हाके यांनी स्पष्ट शब्द सांगितले की, ज्या समाजासाठी आपण रस्त्यावर झटतो त्याच समाजाच्या नेत्यांच्या बैठकीत आमचं नाव घ्यायचं धाडस सरकार करत नाही, हीच खरी जाती अन्यायाची व्याख्या आहे . त्यामुळे त्यांनी आज जेजुरीतून आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली . राज्यातील विविध जिल्ह्यातून ओबीसी तरुण, महिला आणि समाज नेते जेजुरी गडावर दाखल होत असून या मेळाव्याला हजारोंच्या संख्येने गर्दी होण्याची शक्यता आहे .

## ओबीसी नेत्यांची बैठक निष्फळ; 10 ऑक्टोबरच्या मोर्चावर ठाम

● मुंबईतील बैठकीत छगन भुजबळ, विजय वडेट्टीवार, पंकजा मुंडे, बाळासाहेब थोरात यांच्यासारख्या नेत्यांनी हजेरी लावली होती . परंतु, बैठकीत कोणताही ठोस निर्णय झाला नाही . ओबीसी नेत्यांनी सरकारला स्पष्ट शब्द सांगितले की, मराठा समाजासाठी जारी करण्यात आलेला जीआर रद्द केला नाही तर आम्ही रस्त्यावर उतरू . बैठकीतून समाधान न झाल्याने ओबीसी नेत्यांनी 10 ऑक्टोबर रोजी होणाऱ्या सकल ओबीसी समाज मोर्चावर ठाम राहण्याची घोषणा केली आहे . त्यामुळे सरकार समोर आता दोन आघाड्यांचा दबाव निर्माण झाला आहे . एकीकडे मराठा आरक्षणासाठी जरांगे पाटील आंदोलन करत आहेत आणि दुसरीकडे ओबीसी समाजही स्वत :च्या हक्कासाठी पेटून उठण्याच्या तयारीत आहेत .

## पोलीस कॉँस्टेबल स्वप्नील नरोडे यांची सिनेस्टाईल कामगिरी

### समृद्धी महामार्गावर अँगल व सौर पॅनलची चोरी करणाऱ्या टोळीला अटक

### एकट्या पोलिसांने ठोकल्या तीन चोरट्याना बेड्या; शिल्लेगाव पोलिसांची कामगिरी

➤ गंगापूर : गुलाब वाघ



पो.कॉं. स्वप्नील नरोडे

गंगापूर तालुक्यातील शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या डोणगावजवळील समृद्धी महामार्गावर अँगल व सौर पॅनलची चोरी करणाऱ्या तीन चोरट्यांच्या मुसक्या पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल स्वप्निल नरोडे यांनी सिनेस्टाईल कारवाई करत शुक्रवारी रात्री आवळल्या त्यामुळे ग्रामीण पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग, उपविभागीय पोलीस अधिकारी पालवे, शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस



निरीक्षक सलीम चाऊस यांनी स्वप्निल नरोडे यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारून कौतुक केले आहे . याबाबत मिळालेली माहिती अशी की, काल शुक्रवारी रात्री अज्ञात व्यक्तीने समृद्धी महामार्गावर संरक्षणासाठी कठड्याला वापरण्यात येणारे लोखंडे अँगल चोर कापून चोरून नेत असल्याची माहिती पोलिसांना दिली . यानंतर क्षणाचाही विलंब न करता ● पान ४ वर . . .

## शिरेगावच्या शेतकऱ्याने जलसमाधीचा इशारा देताच पाटबंधारे विभाग खडबडून जागी

### पाटबंधारे विभागाचे पथक अंधाऱ्या रात्री सात वाजता पाहणीसाठी धरणात!

### दैनिक वास्तवच्या बातमीचा इम्पॅक्ट

➤ गंगापूर : गुलाब वाघ

तालुक्यातील शिरेगाव येथील गट क्र . 57 मधील 53 आर जमीन प्रत्यक्ष शिल्लेगांव मध्यम प्रकल्पात असूनही संपादित न झाल्याने गेल्या 21 वर्षापासून धरणाला पाणी आल्यावर शेतकरी रमेश माणिकराव कराळे राहणार शिरेगाव यांची उभे पिके असलेली जमीन पाण्याखाली गेली त्यामुळे त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले सदर जमीन धरणाच्या मध्यभागी असूनही संपादित न झाल्याने ही नुकसान सहन करावे



लागते त्यामुळे लवकरात लवकर ही जमीन संपादित करून मावेजा मेळावा अन्यथा 9 ऑक्टोबर रोजी शिल्लेगाव मध्यम प्रकल्पात कुटुंबीयांसह जलसमाधी घेणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला होता व तशी बातमी दैनिक वास्तवने प्रकाशित केली होती त्यामुळे महसूल विभाग व सरकारी प्रशासन जागे झाले व शुक्रवारी रात्री सात वाजता पाटबंधारे विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले व सदर ● पान ४ वर . . .

## लढा दुष्काळाशी चळवळीतर्फे धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचा सन्मान



➤ बीड : अशोक फपाळ

धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी पूरग्रस्त भागात जे काम केले आहे त्याला तोड नाही . त्यानुषंगाने लढा दुष्काळाशी चळवळीच्या वतीने सन्मान करण्यात आला . सामान्य माणसांशी थेट कनेक्ट खासदार अशी ख्याती असलेले खा .ओमराजे निंबाळकर यांनी पूरग्रस्त भागात जे काम केले त्याला तोड नाही . शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना आधार देत मदत केली . ● पान ४ वर . . .

## लासुरला विहिरीत पडल्याने पाण्यात बुडून शेतकऱ्याचा मृत्यू



➤ गंगापूर : गुलाब वाघ

तालुक्यातील लासुर स्टेशन येथे विहिरीत पडल्याने पाण्यात बुडून एका शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज शनिवारी घडली .

याबाबतची अधिक माहिती अशी की येथील शेतकरी गणेश उर्फ बाळू मोहन खंडागळे ( वय वर्ष 42 ) यांची डोणगाव रोडवरील अनंतपूर शिवारात गट न .158 ● पान ४ वर . . .

सामाजिक कार्यकर्त्यांवर विश्वासाची मोहर! ➤ कालिंदा ताईंवर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव

## राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरद पवार गट) महिला आघाडीच्या वडवणी तालुकाध्यक्षपदी कालिंदा कोठुळे

➤ वडवणी : अशोक फपाळ

वडवणी तालुक्यात सामाजिक आणि समाजकारण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सौ . कालिंदा भास्कर कोठुळे यांची राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी ( शरदचंद्र पवार गट ) यांच्या महिला आघाडीच्या वडवणी तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे .

ही नियुक्ती पक्षाचे अध्यक्ष मा . खा . शरदचंद्र पवार, महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षा मा . खा . सुप्रिया सुळे, तसेच प्रदेशाध्यक्षा रोहिणी ताई खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली व आदेशानुसार करण्यात आली . महिला जिल्हाध्यक्षा सौ . संजिवनी ताई देशमुख यांनी स्वत : नियुक्तीपत्र प्रदान केले .

या वेळी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी विश्वास व्यक्त केला की, कालिंदा कोठुळे



या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रातील विविध घटकांना एकत्र आणून महिला सक्षमीकरणासाठी प्रभावी कार्य करतील . पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी त्या आपले नेतृत्व, कार्यतत्परता आणि जबाबदारीने कार्य करतील असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे .कार्यक्रमावेळी प्रा . प्रकाश जेधे सर, तालुकाध्यक्ष महादेव भाऊ जमाले, जिल्हा संघटक ॲड . भास्कर उजगरे, सुरेश भोरे, सुरेश सावंत, साहेबराव करांडे, संभाजी दराडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते .या नियुक्तीबद्दल तालुक्यात सर्वत्र आनंदाचे वातावरण असून कालिंदा ताईंवर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे . त्यांच्या नेतृत्वाखाली वडवणी तालुक्यात महिला आघाडीचे कार्य अधिक वेगाने आणि प्रभावीपणे पुढे जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे .

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मिथुन रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## कर्क रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## सिंह रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## कन्या रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## तूळ रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## वृश्चिक रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## धनु रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

## मकर रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मीन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

# !! मोडला जरी संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा!!!

– अशी वाक्य पुस्तकातच वाचायला बरे वाटतात, परंतु जेव्हा खरी वेळ त्यावेळेस आपण खंबीर साथ देणं गरजेचे असते.

!!भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी अर्ध्यावरती डाव मोडला अधूरी एक कहानी ही कहाणी"

ही वाक्ये पुस्तकातली किंवा एखाद्या ग्रंथातील नसून खऱ्याखुऱ्या वास्तवाचे आहे विषय गंभीर, नाजूक, अंगावर शहारे आणणारा पण अतिशय संवेदनशील व जागरूक असा आहे.

रमा काकु आज माझ्या घरी नवरात्रीच्या निमित्ताने हळदी कुंकू आहे आणि ओटी भरण्याचा कार्यक्रम देखील ठेवला आहे या बर का, सगळेणी या तुम्ही काकी तुम्ही पण या, मामी तुम्ही पण या, आत्या तुम्ही पण, या असं म्हणत म्हणत आमची सयीबाई बघता, बघता गल्ली फिरली, पण गुपर्या नजरेने फक्त हो म्हणणाऱ्यापैकी एकच हळूच हो म्हणली. ती बी कुजबुजत. पुन्हा म्हणते कशी त्या बी बायका उद्याची येणार आहेत का?

म्हणजे सगळ्या सोबत, आमच्या संगच का तसं असेल तर आम्ही परवा येतो बाई !

असं कुठे असतं का काय तरी म्हणे विधवा बायकांना हळदीकुंकू आणि ओटी भरायची! काय तुमचे डोके, हल्लीच्या पोरी तुम्हालाच कळतय! मनाचाच शहाणपणा समदा, आता काय तर रंडक्या बायाला हळदी कुंकू लावायचं ओट्या भरायच्या अग पोरी तुला कळतं का, अशाने देवीचा कोप होईल कोप; असं हळूहळू म्हणत शेजारीन पुढे गेली, आणि पुढची सयीबाई माघं आली, झाली ना सुरु तुम्ही कोणीही नाही आला तरी चालेल?

पण त्या बायका येणारच आणि त्या पण उद्याच येणार आणि मी हळदी कुंकू खाणा नाराळाने ओटी भरणार त्यात ते पण माझ्या आई भवानीच्या साक्षीनं; आशीर्वादाने, कारण माझी आई जगदंबा त्यांच्या पाठीशी आहे खंबीर उभी आहे कायम नाहीतर तुमच्या सारख्या अंधश्रद्धाळ जवळ बाळगणार्या बायका, बायका नसून अपमान कारक वागणूक देतात. एका स्त्रीला पती गेल्यानंतर तिला आध आधार द्या, मानसन्मान करा, तिच्यावर काय वेळ आहे हे जाणून घ्या. कुठल्याच परिस्थिती ती एकटी नव्हती, घरचा उंबरा देखील तिने पतीच्या परवानगीशिवाय ओलांडलेला नव्हता, आणि जिवा पलीकडे विश्वास





विशेष

**सौ.सारिका अरुण बेद्रे**
चिंचगव्हाण

तिचा पतिवर असतो. म्हणून कधी कुठल्या व्यवहार कसा आहे काय आहे हे तिने बघितलेलं नसतं आणि आज जेव्हा पती अचानक तिला सोडून निघून जातो तेव्हा तिला या गोष्टीचा गंधही नसतो आणि अचानक या सर्व गोष्टी करण्याची तिच्यावर वेळ येते. आणि जेव्हा नवऱ्या शिवाय म्हणजे

"ढाली शिवाय तलवार'

बाहेर पडते तेव्हा या समाजातील समाज कंटक लोक तिच्या एकटेपणाचा फायदा घेऊ नयेत किंवा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा होऊ नये म्हणून तिला तिच्याच नवऱ्याच्या नावाचं कुंकू लावू दे ग बाई, ! गळ्यातील मंगळसूत्र त्याच्याच नावाचं घालू दे ग बाई!

मुद्दाम बाई म्हणते कारण बाईच बाईला नाव ठेवण्यासाठी सगळ्यात पहिले बोट दाखवते, तू समजून घेणं त्या एकल महिलेला रात्रंदिवस जी नवऱ्यासाठी सर्व पणाला लावते. त्याला आवडेल तेच करते, तो म्हणल तसंच राहते, तो हसला कि ती हसते, तो रडला किती रडते, एवढा जीव तिच्या नवर्यात असतो तिचा, सगळं आयुष्य नवरा नावाच्या महासागरात सोडुन ही नदी शांत झालेली असते. तिला न वाहण्याची वाट माहित असते ना थांबण्याची वाट, आणि अचानक महासागरच बुडून जातो तेव्हा माझी नदी, माझी माय, माझी बहीण, माझी ताई त्या महासागराला सापडायला सैरावैरा धावत सुटते, आणि ओढे नद्या नाल्या, तलाव, बघत नाही काट्याकुपट्यातून धावतच राहते फक्त त्याला शोधण्यासाठी पण महासागरच बुडून गेलेला असतो, हे जेव्हा तिला कळतं तेव्हा तिला त्यातील मोती वेचायचे असतात, तिच्या पतिच्या पवित्र प्रेमाचे देवा ब्राम्हणांच्या साक्षीने तिला घातलेले तिचे अलंकार रुपी ते म्हणजे मोती पवळे शंख शिंपले हे सुंदर महासागराचे आभूषण असतात, हे तिला हळदीकुंकू रूपाने मंगळसूत्र रुपाने बांगड्या, रूपाने घालायचे असतात, आणि ते घालुन तिच्या महासागराच्या आधाराच्या हरवलेल्या सावलीत माझी सखी डोळ्याच्या पापण्यातून पाणी गाळत गाळत जीवन जगते, पती एकदा मरतो पण त्याची बायको दररोज मरते. त्याच्याशिवाय जगताना घरात काही आहे नाही बघताना, आणि तुमच्या सारखा समाज जेव्हा तिची अवहेलना करतो तेव्हा तर ती खचून खचून मरते. अशा विचाराच्या बायका माझ्याकडे आल्यासंच खऱ्या अर्थानं माझ्या आई जगदंबेचा खूप होईल! कारण माझी आई भवानी नारायणी, जगदंबा, अष्टभुजा मर्दिनी, आदिशक्ती ही सर्व शक्तीचे माहेर आहे आम्हा सर्वांची आई कायम या सर्वा महिलांच्या पाठीशी उभी आहे. बायांनो तुम्ही नाही आला तरी चालेल! पण तुमचे असले विचार समाजात पसरवू नका. वेळ काळ कोणालाच सांगून येत नाही! देव न करो आणि कधी कोणावर अशी वेळ येवो. आणि हो रमाकाकू पुढच्या वर्षी तुम्ही नक्की येणार आणि त्याच दिवशी येणार आणि एवढेच नाही तर तुमच्या घरी सुद्धा विधवा महिलांसाठी हळदीकुंकू करणार! कारण माझ्या रामा काकूंना अंधश्रद्धेतून काढणारी सयीबाई खूप उशिरा भेटली, म्हणून त्यात काकुंची काहीही चूक नाही, जेव्हा ज्ञानरूपी सागरातून अज्ञान दूर होईल तेव्हाच विधवा एकल आणि सौभाग्यवती ही दरी दूर होऊन एकत्र हळदीकुंकू होईल आणि त्या हळदीकुंकू कार्यक्रमाला विधवा महिलांना श्रीमती ताई म्हणून घरोघरी सन्मानाची ओटी खणा नाराळाणं भरण्यासाठी बोलावण्यात ऐईल हाच खरा माझ्या आई जगदंबेचा सन्मान करुन समाजात क्रांतीचा दसरा होईल.

# विमलनाथ जैन मंदिरात धार्मिक गरबा रास डांडिया प्रतिसाद शताधिक बालकांनी केला रास दांडीया





➤ **छत्रपती सभाजीनगर :** शताधिक बालकांनी केला रास

ऐतिहासिक नगरी आणि विविधता ने नटलेल्या कला संस्कृतिचे माहेर घर असलेल्या शहरात यंदा भारतीय परंपरा संस्कृति – शिक्षा – संस्कार – मर्यादा हयाची व धर्म परम्परा ची मुहूर्त मेढ़ ही लहान वयात बीजा रोपण चे कार्य है धार्मिक अनुष्ठानातून होते हाच उद्देश्य संकल्प घेऊन जैन समाज च्या विरती महिला मंडल द्वारे प्रथम च औरंगाबाद जैन श्वेतांबर मूर्तिपूजक श्रीसंघ श्री विमलनाथ जैन मंदिर आराधना भवन येथे 3 दिवसीय (गरबा) डांडिया रास चे आयोजन करण्यात आले होते त्रिदिवसीय कार्यक्रमा चे दिप प्रज्वलन अध्यक्ष श्री अनिलकुमार संचेती – माजी सचिव श्री नरेंद्र गेलड़ा, संगीतरत्न श्री संजय संचेती, महावीर जन्मोत्सव च्या महिला अध्यक्ष संगीता अनिल कुमार संचेती, सौ मंगला महावीर कोठारी,

विरती ग्रुप च्या अध्यक्ष सौ सोनाली कोठारी, भा ज पा चे महावीर भन्साली – उधोजक जितेंद्र कोठारी यांच्या हस्ते करण्यात आले ह्या संपूर्ण कार्यक्रमात फक्त पारंपरिक व धार्मिक गीताची प्रस्तुति करण्यात आली वय वर्ष 5 ते 15 आयुचे बालक बालिका आणी महिला यांना ही अत्यंत मनमोहक रंगिन आकर्षक वेश भूषा व नटुन ठटुन भक्ति भावे ने डांडिया रास मध्ये रमुन गेले प्रथमच आयोजित केलेल्या ह्या कार्यक्रमस श्री औरंगाबाद जैन मूर्तिपूजक संघा चे अनमोल साथ मिळाली मंदिराचे परिसर व सुसज्जित डेकोरेशन केलेले हॉल जैन भक्तिमय संगीत या सोबत प्रायोजक चे विशेष सहकार्य जीतो इंटरनेशनल शाखा छ संभाजीनगर, श्री संघ आणि संचेती परिवार यांचे मिळाले संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यात साठी विरती ग्रुप च्या पुर्णिमा रुणवाल, रंजू जैन, श्वेता सुराणा, निधि जैन, स्मिता कोठारी, आणि सूत्र संचालन रिद्धि कोठारी यांनी केले जजेस रुपाली रावका, स्वेता कासलीवाल, सपना मुथीयान यानी केले

# हजारो भक्तांच्या साक्षीने भव्य रथयात्रेने समवशरण विधानाची सांगता

## दानदेणे,देवपुजा करणे हे भक्ताचे परम कर्तव्य असते. उपाध्याय विरंजनसागर महाराज





➤ **छत्रपती सभाजीनगर :** श्री चंद्रप्रभू खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर अंतर्गत कैलास शिल्प हडको येथे सुरू असलेल्या समवशरण महाविधानाची हजारो भक्तांच्या उपस्थितीत विश्वकल्याणाची प्रार्थना करत शोभायात्रेने रवीवारी सांगता झाली.

उपाध्याय विरंजनसागर ससंघ, मुनीश्री प्रभावसागर यांच्या उपस्थितीत कैलास शिप्ल येथून चंद्रप्रभू मंदिर पर्यंत निघालेल्या शोभायात्रेत ते रथात विराजमान होते. यावेळी पंचरंगी ध्वज घेऊन धार्मिक नृत्य करत होते.

दानदेणे, देवपुजा करणे हे भक्ताचे परम कर्तव्य असते. पैसा हा पुण्याईमुळे मिळतो प्रभूभक्तीमुळे अशक्य गोष्टी शक्य होतात. अहंकार देणाऱ्या पैशाच्या मागे न जाता, धर्माच्या मागे धावा असे अवाहन उपाध्याय विरंजनसागर गुरुदेव यांनी केले.

यावेळी गुरुदेवांचे पादप्रक्षालन इंदरचंद मनोजकुमार, रितेश, पाटणी यांनी केले. शास्त्रभेट सुभाषचंद, आतिश, योगेश, रोहित, मंत्र काला परिवार यांनी दिले. शांतिमंत्र उषा डॉ. सुरेशचंद बडजाते (पंढरपूर) बाहुबली, नितेश दिलीप काला यांनी केले. यानिमित्त गुरु भक्ताकडून महाप्रसाद देण्यात आला. यावेळी अध्यक्ष प्रकाश ठोले, उपाध्यक्ष मनोज दगडा महामत्री अशोक अजमेरा, सहसेकेटरी सुरजमल छाबडा, कोषाध्यक्ष मुकेश पाटणी, विश्वस्थ कैलास कासलीवाल, निलेश काला, कार्यकारणी अध्यक्ष राजकुमार बडजाते, सचिव संजय पाटणी दिलीप पाडे अमोल पाटनी सतोश झाझरी यावेळी सौधर्म इंद्र इंद्राणी स्वप्नाली नितेश बडजाते, चव्रवर्ती इंद्र मंजु मुकेश पाटणी, कुबेर इंद्र विजया विनोद सेठी, महायज्ञनायक प्रिती महावीर बाकलीवाल, मुख्य कळस स्थापन कर्ता अरूणा प्रकाश ठोले विजय अमित सुमित गंगवाल परिवार विनिता संजीवकुमार सिघई ईशान इंद्र मिना संतोष पापडीवाल, महेंद्र इंद्र ज्योती संजय पाटणी, सानद इंद्र किरण दिलीप पांडे, ब्रम्ह इंद्र अरणा रमेश छाबडा, ब्रम्होत्तर इंद्र अल्का विलास कासलीवाल, सानद इंद्र राणी सुमित बाकलीवाल, कापीष्ठ इंद्र ज्योती देवेंद्र गंगवाल, शुव्र इंद्र वैशाली वर्धमान ठोले, महाशुव्र इंद्र भारती रविंद्र बाकलीवाल, शतार इंद्र आशा कैलास कासलीवाल, सहस्त्रार इंद्र ज्योती प्रकाश सेठी, अंतव इंद्र भारती प्रशांत पाटणी, प्राणत इंद्र संगीता संजय पाटणी, अच्युत इंद्र संगीता वर्धमान काला, पुर्व दिशा कळस स्थापन कर्ता उज्वला अशोक अजमेरा, पशिश्चम दिशा कळस वर्षा अतिश काला, दक्षिण दिशा कळस निखा नितेश कासलीवाल, उत्तर दिशा कळस शितल योगेश ठोले आदीच्या उपस्थित महाअर्चना पुजा विधान सागता झाली. कार्यकमासाठी अष्टकुमारीका प्रतिक्षा पापडीवाल, सोनल बडजाते, रिहु कासलीवाल, विभा कासलीवाल, पलक काला, रिदीमा बाकलीवाल, विशा पांडे, कशिश गंगवाल हया लाभल्या होते. तसेच विधान सयोजक पंकज छाबडा व निलेश काला सतोष पापडीवाल व योगेश ठोले, दिलीप पांडे, शुभम पांडे, शितल पाटणी, दिनेश पाटोदी, राजेद्र लोहाडे, अमित गगवाल डॉ. शैलेश चांदीवाल, सागर लोहाडे, रूपेश छाबडा सजय लोहाडे सूरेश पाडे अमोल मोगले निलेश सावलकर रमन साहुजी विकरम साहुजी आदीनी परीश्रम केले अशी माहिती पियुष कासलीवाल, नरेंद्र अजमेरा, प्रशांत शहा यांनी दिली.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922



# मुंबई विमानतळावर ७९ कोटींचे कोकेन जप्त

➤ मुंबई : प्रतिनिधी

डीआरआय मुंबईने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ७९ कोटी रुपयांचे कोकेन जप्त केले असून या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे . डीआरआय मुंबईच्या विभागीय युनिटने बँकॉकहून मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर येणाऱ्या दोन महिला प्रवाशांकडून बेकायदेशीरपणे आणलेले ७ .९५ किलो कोकेन जप्त करण्यात आले आहे . बँकॉकहून मुंबईत आलेल्या दोन महिला प्रवाशांना डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी विमानतळावरच रोखले . तिथे त्यांच्या सामानांची तपासणी केली असता खेळण्यांच्या पॅकेटमध्ये लपवून ठेवलेला मुद्देमाल हस्तगत केला .

# नवी मुंबई विमानतळाचे 8 ऑक्टोबर रोजी पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

● पान ४ वरून . . . 1160 हेक्टर क्षेत्रावर पसरलेल्या या विमानतळाचे 4 टर्मिनल टप्प्याटप्प्याने उभारले जात आहेत . पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर हे केंद्र दरवर्षी 9 कोटी प्रवासी आणि 32 .5 लाख टन कार्गो हाताळू शकणार आहे, ज्यामुळे आशियातील सर्वात मोठ्या विमानतळांपैकी एक म्हणून याची ओळख निर्माण होणार आहे . सध्या प्रथम टर्मिनल पूर्ण झाले असून, त्याची क्षमता 2 कोटी प्रवासी आणि 8 लाख टन कार्गो इतकी आहे . यासाठी स्वतंत्र धावपट्टी देखील बांधण्यात आली आहे . संपूर्ण मल्टी–मोडल कनेक्टिव्हिटी हे भारतातील पहिले विमानतळ आहे जे एक्सप्रेसवे, महामार्ग, मेट्रो, उपनगरी रेल्वे आणि वॉटर टॅक्सी यांसारख्या वाहतूक व्यवस्थेशी जोडलेला असेल . ऑटोमेटेड पॅसेंजर मूव्हमेंट सिस्टममुळे प्रवाशांना सर्व टर्मिनलमध्ये सहज हालचाल करता येणार आहे .तसेच, हा एक ‘ हरित ’ विमानतळ ठरेल, कारण येथे शाश्वत विमान इंधन साठवण्याची सुविधाही उपलब्ध असेल . विमानतळाला डी .बी . पाटील यांचे नाव या विमानतळाचे नामकरण स्वर्गीय डी .बी . पाटील यांच्या नावाने करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे . डी .बी . पाटील हे सामाजिक कार्यकर्ते होते, ज्यांनी या प्रकल्पामुळे प्रभावित झालेल्या लोकांच्या हक्कांसाठी संघर्ष केला होता . राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी या नावास मान्यता दिली असून, व्यावसायिक सेवा सुरू झाल्यावर नवीन अधिकृत नाव जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली . पंतप्रधानांचा दौरा आणि उद्घाटन कार्यक्रम आगामी 8 ऑक्टोबर रोजी दुपारी 2 .40 वाजता, पंतप्रधान नरेंद्र मोदी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचतील . सुमारे 2 तास विमानतळावर थांबून ते प्रथम टर्मिनलची पाहणी करतील आणि उपस्थितांना संबोधित करतील, अशी माहिती सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल यांनी दिली .



# राजु शेट्टी यांच्या उपस्थितीत पैठणला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रास्ता रोको

➤ पैठण : सर्जेराव खडसन

पैठण येथील सह्याद्री नाक्यावर दि . ( ४ ) शनिवार रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांच्या उपस्थितीत स्वाभिमानी शेतकरी संघटना, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना ( उबाठा ) यांच्यावतीने राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकरी आणि पूरग्रस्तांना दिवाळीच्या आत तात्काळ मदत करण्यात यावी तसेच ईतर मागण्यासाठी भव्य असे रोको आंदोलन करण्यात आले .

# भिमसैनिकांकडून तिसरा स्वाभिमानी विजयी दिवस जल्लोषात





➤ छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही आंबेडकरी चळवळीच्या जिगरबाज निष्ठावान भिमसैनिकांच्या वतीने मोठ्या जल्लोशात प्रती विद्यापीठ कमाण पतन करित स्वाभिमानी विजय दिवस साजरा करण्यात आला .

तीन वर्षांपुर्वी विद्यापीठ प्रशासनाकडून सुशोभीकरणाच्या नावे जानिवपूर्वक अनेक शहीद भिमसैनिकांच्या त्याग व बलिदानातुन उभ्या असलेल्या ऐतिहासिक डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कमाणीचे महत्व कमी करण्याच्या उद्देश्याने त्यासमोरच बांधन्यात आलेली भव्य प्रतीकमान ही काही जागरुक स्वाभिमानी भिमसैनिकांनी अनेक त्रीव आंदोलने करून पाडली होती, प्रती कमाण पाडण्यासाठी लढा उभारणार्या भिमसैनिकांनी या आंदोलना दरम्यान आलेल्या कटु अनुभव सांगितले .प्रती कमानीचे उभे असलेल्या तिन कॉलम पैकी केवळ एकच कॉलम काढत प्रशासनाने काही संघटनांचा पाठींबा मिळवीत

या आंदोलनात फुट पाडली व प्रती कमाणीचे उर्वरीत दोन कॉलम व उर्वरित बांधकाम काढणार नाही अशी आडमुठी भुमिका विद्यापीठ प्रशासनानें घेतली होती परंतु आंबेडकरवादी बहुजन विकास समितीने व काही जागरूक स्वाभिमानी भिमसैनिकांनी हा लढा कशाचीही पर्वा न करता हा लढा सुरुच ठेवला त्रिव आंदोलने करीत शेवटी प्रशासनाला नमवीत प्रती कमाणीचे उर्वरीत सर्वच बांधकाम हे जेसीबी मशीन लावुन पाडण्यास भाग पाडले व यावेळी एकच आंनदोस्तव भिमसैनिकांनी साजरा केला होता .तेव्हा पासुन या २६ सप्टेंबर रोजी या समाज अस्मीतेच्या लढ्याची आठवण म्हणुन “स्वाभिमानी विजय दिवस” साजरा केला जातो .या घटनेस आज तीन वर्ष पुर्ण झाल्याने सर्व पक्षीय आंबेडकरवादी पक्ष संघटना व आंबेडकरवादी बहुजन विकास समितीने आज महामानव विश्वरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुण अभिवादन करुन विद्यापीठ गेटला शहीद स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करुण अभिवादन करीत पुज्यनिय बौद्ध भिक्खु संघाने संघप्रिय थेरो, बोधीधम्मो, आर आनंद, भंते निर्वान यांच्या वतीने बौद्ध वंदना घेण्यात आली यानंतर महापुरुषांच्या व नामांतर शहीद अमर रहें, स्वाभिमानी विजय दिनाचा विजय असो अशा गगनभेदी घोषणा देत भिमसैनिकांनी परीसर दणाणुन सोडला .

यानंतर भव्य आतिशबाजी करीत नागरीकांना मिठाई वाटप करित स्वाभिमानी विजयी दिवस जल्लोशात साजरा करण्यात आला यावेळी आंबेडकरवादी बहुजन विकास समिती अध्यक्ष दिपक निकाळजे, कुंदन लाटे, अमित वाहुळ, मुकेश खोतकर, गुल्लु वाकेकर, संदीप जाधव, विष्णु जगताप, धम्मपाल वनवे, अरविंद कांबळे, प्रांतोष वाघमारे, सतिश शिंदे, मेघानंद जाधव, सचिन जोगदंड, संजय सातपुते, जयश्री शिरके, सुनिल कीर्तिशाही, कपिल बनकर, सोनु नरवडे, राहुल अंकूशे, संतोष चव्हाण, सिध्दोधन मोरे, नागेश केदारे, नागेश जावळे, ॲड .अतुल कांबळे, सचिन शिंगाडे, सिध्दार्थ जाधव, विकास रोडे, किशोर खिल्लारे, राजु खांडेकर, लखन सूर्यवंशी, नितीन निकाळजे, अमर आंबेडकर, सिध्दार्थ सुर्यवंशी, दिपक गवळी, लखन सुर्यवंशी, अनामी मोरे, सम्यक सरपे, दादाराव सोनट्टके, इद्रीस पठान अनिल नवगिरे, प्रेम जाधव, भैय्या बनकर, नासिर पठाण, निखिल निकाळजे, गणेश वाहुळ, शुभम सौदागर, विशाल वाहुळ व आंबेडकरी चळवळीच्या भीमसैनिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती .

# नाशिकच्या नव्या रिंग रोड आणि साधूग्रामचे काम लवकर पूर्ण करा–देवेंद्र फडणवीस

मुंबई : कुंभमेळा हे श्रद्धा, सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचे प्रतीक आहे . नाशिक–त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठीची पायाभूत सुविधांची सर्व कामे दर्जेदार आणि गतीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले . नाशिकमधील नवीन रिंग रोडचे काम पूर्ण करण्याबरोबरच साधू ग्राम/टेंटसिटीसाठीची भूसंपादनाची कामेही गतीने पूर्ण करण्यात यावीत असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले . ते सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे नाशिक – त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ आढावा बैठकीत बोलत होते .

सिंहस्थ कुंभमेळा हा धार्मिक श्रद्धेचे प्रतीक आहे .संपूर्ण कुंभमेळा कालावधीत रामकुंडात आणि नेहमीसाठीच नदीपात्रातील पाणी स्वच्छ राहील हे कटाक्षाने पाहावे . मलनि :स्सारणाची कामे प्राधान्याने हाती घेऊन पूर्ण करण्यात यावीत . विमानतळे आणि रेल्वे सुविधांची कामेही गतीने पूर्ण करावीत . नाशिकमधील नवीन रिंग रोडचे काम त्वरित पूर्ण करावे . या कामात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही . यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक निधी त्वरित मंजूर करुन घ्यावा . इतर रस्त्यांची कामेही त्वरित हाती घेण्यात यावी . कामे अपूर्ण राहिल्याने नागरिकांची गैरसोय होता कामा नये याकडे लक्ष द्यावे . विविध आखाड्यांशी चर्चा करून त्यांच्या गरजेनुसार साधूग्राममध्ये सुविधा उपलब्ध




करून देण्यात याव्यात . सीसीटीव्ही कॅमेरे प्रणाली केंद्रीकृत पद्धतीने तयार करण्यात यावेत . कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ‘ एआय ’च्या विविध पर्यायांचा वापर करण्यात यावा . ‘ मार्व्हल ’चाही उपयोग करून घेण्यात यावा . पोलिसांच्या निवासासाठीची व्यवस्था प्राधान्याने करण्यात यावी . द्वारका सर्कल येथील कामे त्वरित पूर्ण करावी . सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेद्वारे बस सेवेचे नियोजन करण्यात यावे . वाहनतळांच्या ठिकाणी भं

कुंभमेळ्याच्या प्रचार– प्रसिद्धीसाठी ‘ डिजिटल कुंभ ’ ही संकल्पना राबविण्यात यावी . प्रचार प्रसिद्धीसाठी स्वतंत्रपणे वेगळा आराखडा तयार करून नियोजन करण्यात यावे . कुंभमेळा कामांसंदर्भात कोणत्याही प्रकारची नकारात्मक प्रसिद्धी होत असल्यास संबंधित विभागांनी यासंदर्भातील वस्तुनिष्ठ खुलासा त्वरित संबंधित माध्यमांना द्यावा . कुंभमेळ्यासाठीच्या आवश्यक कामांसाठी जिल्हास्तरावरील नोकरभरतीलाही गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले .

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, कुंभमेळ्यासाठीची विविध कामे वेगाने पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा . तयार होणाऱ्या सुविधा या दीर्घकालीन असाव्यात असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले .

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, कुंभमेळ्यासाठीची सर्व कामे दर्जेदार आणि वैशिष्ट्यपूर्ण होतील याकडे लक्ष द्यावे . पोलिसांच्या निवासव्यवस्थेसही प्राधान्य द्यावे, असे पवार यांनी सांगितले . अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ म्हणाले, कुंभमेळा कालावधीत व नेहमीसाठीही नदीपात्रातील पाणी शुद्ध राहील यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात . तसेच नागरिकांची गैरसोय होणार नाही यादृष्टीने नियोजन करण्यात यावे . शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे म्हणाले, अनेक तीर्थक्षेत्रे कुंभमेळ्याच्या परंपरेशी जोडलेली असल्याने कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर जवळपासच्या तीर्थक्षेत्रांच्या विकासकामांनाही गती देण्यात यावी . जलसंपदा मंत्री गिरीश महाजन म्हणाले, कुंभमेळ्यापूर्वी रस्त्यांची तसेच मलनि :स्सारणाची कामे पूर्ण करण्यात यावीत .

# महा जम्बो शब्दकोडे



## आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

## उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. ‘शुक्रतारा’ हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

## महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर



वि शे ष



## तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत स्वामी विवेकानंद विद्यालयाचे नेत्रदिपक यश

माजलगाव / प्रतिनिधी : महाराष्ट्र शासन आयोजित संभाजीनगर विभागाअंतर्गत तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत स्वामी विवेकानंद विद्यलयाने नेत्रदिपक यश मिळविले आहे. या विद्यालयाची विद्यार्थीनी राधा बाबासाहेब घाटुळ तिहेरी यश मिळविले आहे.

राधा ही १९ वर्षे वयोगटातून ४०० मिटर धावणे व गोळा फेक या स्पर्धेत तालुक्यात प्रथम आली आहे तर १९ वर्षे वयोगटातून ४ बाय ४०० मिटर रिले या स्पर्धेत वैष्णवी विष्णू लकडे, श्रेया अशोक पवार, सुजाता सदज मदने, स्नेहल शैलेंद्र राठोड व राधा नानासाहेब घाटुळ यांनी प्रथम क्रमांक मिळविला तसेच १७ वर्षे वयोगटातून २०० मिटर धावणे या स्पर्धेत पलुजा चव्हाण ही तृतीय आली आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सोनाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मोहन जगताप, सचिव राहुल जगताप, मुख्याध्यापक लक्ष्मण जगताप, सुधाकर करांडे, एकनाथ चव्हाण, प्रशांत खडके, क्रिडा शिक्षक बालाजी तिडके, अरूण माने, श्रीकृष्ण थेटे, शिवदास बनसोडे, संदेश फुके, दिलिप घाटुळ, शरद राठोड, विनायक चौरे, वैभव सोळंके, शरद जावळे, संतोष ढेरे, लक्ष्मी अहंकारे, हेमलता भोसले, मोहिनी जाधव, प्रल्हाद चाळक, पांडुरंग कवडे यांनी अभिनंदन केले आहे.

## ओबीसी महामोर्चा दहा ऑक्टोबरलाच होणार



मुंबई (प्रतिनिधी) : सरकारने सकल ओबीसी संघटनांच्या या मागण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने १० ऑक्टोबर रोजी नागपूरात महामोर्चा होणारच, अशी भूमिका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी घेतली आहे. राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयामुळे ओबीसी आरक्षणाला धक्का बसणार आहे. हा शासन निर्णय रद्द करावा तसेच २०१४ पासून दिलेली कुणबी प्रमाणपत्र आणि जातपडताळणी प्रमाणपत्र याची श्वेतपत्रिका काढावी या दोन मागण्या शनिवारी ओबीसी संघटनांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या. सह्याद्री अतिथीगृह इथे सकल ओबीसी संघटनांची मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत विविध ओबीसी संघटनांच्या प्रतिनिधींनी आपली भूमिका मांडली. २ सप्टेंबर रोजी काढलेल्या जीआरने ओबीसी समाजाच्या हक्काचे आरक्षणाला धक्का लागणार आहे. गावपातळीवर अनेक ठिकाणी खाडाखोड करून प्रमाणपत्र तयार केली जात आहे, यंत्रणांवर दबाव टाकून प्रमाणपत्र बनवली जात आहे. मराठवाड्यात दोन समाजात वितुष्ट निर्माण झाले आहे, एकमेकांच्या लग्नाला जाण टाळत आहे, शाळांमधून विद्यार्थ्यांना काढायला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रात द्वेषाचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्या गतीने जातप्रमाणपत्र वाटली जात आहे त्यातून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसी समाजाला प्रतिनिधित्व राहणार नाही असा धोक्याचा इशारा काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी बैठकीत दिला. २ सप्टेंबर रोजी सरकारने काढलेल्या शासन निर्णयानंतर राज्यात १२ ओबीसी तरुणांनी आत्महत्या केल्या आहेत. काही ठिकाणी दोन समाजात हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात दरी निर्माण झाल्याने हा शासन निर्णय रद्द करावा अशी आमची मागणी आहे. १० ऑक्टोबरला मोर्चा निघणार आहे. तोपर्यंत निर्णय घ्यावा आणि सरकारच्या प्रतिनिधींनी मोर्च्यात येऊन आपली भूमिका स्पष्ट करावी असे वडेट्टीवार यांनी सांगितले.



## नवी मुंबई विमानतळाचे 8 ऑक्टोबर रोजी पंतप्रधानांच्या हस्ते उद्‌घाटन

➤ मुंबई : प्रतिनिधी

नवी मुंबई : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे आगामी 8 ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्‌घाटन होणार आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ ठरणार असून, यामुळे मुंबईच्या वाढत्या हवाई वाहतुकीवरील ताण कमी होण्याची अपेक्षा आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात अदानी समूहाचा 74 टक्के तर महाराष्ट्र सरकारच्या सिडको संस्थेचा 26 टक्के हिस्सा आहे. विमानतळाच्या पहिल्या टप्प्यासाठी सुमारे 19 हजार 647 कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे, तर संपूर्ण प्रकल्पाचे बजेट 1 लाख कोटी रुपयांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. या नव्या विमानतळाला 30 सप्टेंबर रोजी नागरी उड्डाण महासंचालनालयाकडून (डीजीसीए) उड्डाण परवाना प्राप्त झाला असून, डिसेंबर 2025 पासून येथे व्यावसायिक उड्डाणे सुरू होणार आहेत. एअर इंडिया, इंडिगो आणि अकासा एअर या देशांतर्गत विमान कंपन्यांनी त्यांच्या काही सेवा या नवीन विमानतळावर हलवण्याची घोषणा केली आहे. 'NMI' कोड आणि जागतिक दर्जाचे सुविधासंपन्न केंद्र आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेने (आयएटीए) या विमानतळाला 'एनएमआय' हा कोड दिला आहे. ● पान ३ वर...

# व्यंकटरामन गोविंद नामाने शहर दणाणले

## ➤ माजलगाव येथील बालाजी मंदिरात ब्रह्मोत्सवाची भक्तीभावात सुरुवात

➤ माजलगाव : प्रतिनिधी

शहरातील बालाजी मंदिर येथे दि. ४ ते ६ ऑक्टोबर दरम्यान ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. काल शनिवारी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या यात्रेत बाल वारकऱ्यांनी सादर केलेल्या नृत्याने लक्ष वेधले.

बालाजी मंदिर सेवा फाऊंडेशन, माजलगावच्या वतीने व्यंकटेश बालाजी श्री. सहस्त्र कलशाभिषेक विधी चे आयोजन करण्यात आले आहे. हवन विधी चे यजमान उज्वल शिवप्रसाद भुतडा हे असून श्री. गणपती पुजन, देवता स्थापन, अग्नी स्थापन, ग्रहयज्ञ व सहस्त्र कलशासादन अर्चन इत्यादी पूजन होणार आहे. शनिवार झेंडा चौक ते शिवाजी महाराज चौक ते बालाजी मंदिर येथून शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत समाज बांधव व महिला भगिनीं, भाविक भक्त उपस्थित होत्या. चिमुकल्या वारकऱ्यांनी व बालाजी भगवानच्या पालखीने लक्ष वेधले होते. फुगडी खळेत भक्तांनी आनंद व्यक्त केला.

आज रविवार ब्रम्होत्सवा व श्री. सहस्त्र कलशाभिषेक विधी दुतीय दिवस एक हजार महिला द्वारे विष्णुसहस्त्रनाम व्यंकटेश स्तोत्र चे वाचन होईल. (दि. ६) सोमवार महाआरती व ब्रम्होत्सव व श्री. सहस्त्र कलशाभिषेक विधी तृतीय दिवस एक हजार महिला च्या वतीने विष्णूसहस्त्रनाम व व्यंकटेश स्तोत्र चे वाचन







कोजागिरी पौर्णिमा, त्रिशोपचार महापूजन, ध्वजारोहण, नैवेद्य, महाआरती श्री महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे.

महाप्रसादाचे यजमान रामस्वरूप खंडेलवाल व कारभारी काळे हे आहेत. याचा लाभ घ्यावा असे आवाहन बालाजी सेवा संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## सोन्नाथडी येथील सरपंच सौ वंदना तपसे यांच्या विरुध्द अविश्वास पारित

**10 पैकी 8 सदस्य अविश्वासाच्या बाजूने !**

➤ माजलगाव : प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे सोन्नाथडी येथील सरपंच सौ वंदना केरबा तपसे यांच्या वरील अविश्वस ठराव बहू मतांनी पारित झाला. सरपंच वंदना केरबा तपसे यांच्या विरुध्द अविश्वास ठराव दाखल करण्या बाबतची कारणे खालील प्रमाणे होती.





१. गावातील विविध विकासकामात आडकाठी आणुन सदरच्या विकासकामांना विरोध करणे, तसेच वित्त आयोगातील रक्कमेमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करणे.

२). तसेच गावात ग्रामसभा व मासिक सभा न घेणे. सदस्यांच्या खोट्या सह्या करुन, ग्रामसेवकांच्या मदतीने खोटा रेकॉर्ड तयार करुन मासिक सभा व ग्रामसभा झाल्या आहेत असे कागदोपत्री दर्शविणे,

३). कोणत्याही शासकीय योजनेत स्वत :ला व कुटूंबाला जास्तीत जास्त आर्थिक लान करुन घेणे,

४). तसेच ग्रामपंचायत मधील इतर सदस्यांनी सुचविलेल्या विकासकामांना विरोध करुन सदस्यांच्या वार्डामध्ये विकासकामे न होऊ देणे,

५). तसेच सरपंचाने केलेल्या कोणत्याही भ्रष्टाचारा बद्दल अथवा न झालेल्या विकासकामाबद्दल कोणत्याही ग्रामपंचायत सदस्याने जाब विचारला असता, त्या सदस्याला पती केरबा तपसे यांच्या मार्फत अर्वाच्च भाषेत शिव्या देवुन खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देणे.

६). गावातील नागरीकांना ग्रामपंचायत मार्फत पुरविल्या जाणाऱ्या नागरी सुविधा न पुरविणे. (पाणी, लाईट, रस्ते, सांडपाणी व्यवस्थापन न करणे.)

७). गावातील नागरीकांना व ग्रामपंचायत सदस्यांना दुय्यम दर्जाची वागणुक देऊन नेहमी अपमानीत करणे.

८) स्वत :च्या सरपंच पदाचा व ग्रामपंचायतचा कारभार पुर्णत : पती केरबा तपसे यांच्या मार्फत पाहणे.

आदी कारणांचा उल्लेख दिलेल्या अविश्वास ठरावात केला होता आणि या ठरावात असे ही नमूद केले होते की, सदरचा अविश्वास ठराव हा आम्ही वरील कारणामुळे आमच्या राजीखुशीने, कुणाच्याही दबावाला बळी न पडता आठ दिवसापुर्वी तहसिल कार्यालय माजलगांव येथे स्वत : हजर राहुन तहसिलदार साहेब यांच्या दालनात दाखल करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर येथील ग्रामपंचायत कार्यालयात काल दि ४ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वा मा तहसीलदार संतोष रुईकर यांच्या अध्यक्षतेखाली आम सभा घेण्यात आली आणि हात वरून मतदान घेण्यात आले या वेळी अविश्वास ठरावाच्या बाजूने खालील पैकी आठ सदस्यांनी आपली नाराजी व्यक्त करत मतदान केले यात. १. विनय व्यंकटराव डक (उपसरपंच) २. पांडुरंग नारायण वगरे (सदस्य) ३. आशामती जाणकीराम पवार (सदस्य) ४. भगवान निवृती कांबळे (सदस्य) ५. बंडु श्रीमंत शिंदे (सदस्य) ६. आशाबाई ग्निनानदेव वाघमारे (सदस्य) ७. जयश्री विष्णु गोरे (सदस्य) ८. उर्मिला रघुनाथ डाके (सदस्य) आदींच्या सह्या आहे तर विद्यमान सरपंच सौ वंदना केरबा तपसे व श्रीमती अर्चना लक्षीमन व्हरकटे या झालेल्या प्रक्रिया ला अनुउपस्थित राहील्याने हा ठराव २ विरुद्ध ८ असा पारित झाला. या वेळी तहसीलदार संतोष रुईकर, शिंदे सर आणि चव्हाण सर यांनी ही निवडणूक प्रक्रिया पार पाडली तर या अविश्वास ठरावाची आजून एक प्रक्रिया बाकी राहीली आहे.

## मोगरा पुरगस्तांना मित्रपरिवारा कडून जीवनावश्यक वस्तू किट चे वाटप

➤ माजलगाव : प्रतिनिधी

यावर्षी ढगफुटी सदृश्य व मुसळधार पावसामुळे गोदावरी व सिंदफणा नदीला महापूर आल्यामुळे अनेक गावातील घरांचे, शेतीचे, मंदिराचे प्रचंड नुकसान झाले. त्याचप्रमाणे मोगरा गावातही पुराचे पाणी घुसल्याने नुकसान झाले आहे. त्या गरजु पुरग्रस्तांना मोगरा गावातील काही ग्रामस्थांच्या व मित्रपरिवाराच्या वतीने मोफत जिवनावश्यक वस्तुंचे किट देउन मदतीचा हात दिला आहे.

तालुक्यातील मोगरा येथे गोदावरी नदीला पुर आल्याने गावाला वेढा पडला होता. परिणामी शाळेच्या इमारतीत, मंदिरात, घरांमध्ये पाणी घुसल्याने जनजिवन विस्कळीत झाले आहे. सर्वत्र चिखलमय परिसर झाल्याने अनेकांचे नुकसान देखिल झाले आहे. त्या गरजु पुरग्रस्तांना दि. ४ ऑक्टोबर शनिवारी



रोजी सकाळी ९ वाजता मोगरा येथे किराणा किटचे वाटप करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक तालुका संघचालक जगदीश साखरे, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, प्रा. कमलकिशोर लड्डा, प्रा. अशोक काळे, उपप्राचार्य युवराज मुळये, डॉ. किशोर रत्नपारखी, गिन्यानदेव राठोड, संदिप सावंत, तुकाराम भोजणे, अमित धुमाळ, ग्रामसेवक श्री. टकले, श्रीहरी शिंदे, शिवाजी वाकळे यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.

## ओमराजे निंबाळकर यांचा सन्मान

● पान १ वरून... त्यानुषंगाने लढा दुष्काळाशी चळवळीचे प्रणेते ॲड. राज पाटील यांनी आज धाराशिव येथे खासदार ओमराजे निंबाळकर यांचा रोपटे आणि संत तुकाराम महाराज यांची गाथा भेट देऊन सन्मान केला. यावेळी मुंबईच्या आरोग्यदूतचे संपादक बाबा देशमाने, सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब खंदारे, पत्रकार अशोक फपाळ, अभियंता निखील वीर आदींची उपस्थिती होती.

**ओमराजे निंबाळकर यांचा इतर राजकारण्यांनी आदर्श घ्यावा : ॲड. राज पाटील** राजकारणलीकडे जाऊन धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी तब्बल आठ दिवस पूरग्रस्त भागात जाऊन शेतकऱ्यांना मदत केली. दु :खितांची आसवे पुसली. इतर राजकारणी आलिशान गाडी, विमानातून नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. ओमराजे निंबाळकर यांचा आदर्श इतर राजकारण्यांनी घेण्याची गरज असल्याचे ॲड. राज पाटील यांनी सांगितले.

## पाटबंधारे विभाग खडबडून जागी

शेतकऱ्याच्या धरणात असलेल्या मात्र संपादित न झालेल्या जमिनीत असलेल्या मका पिकात पाणी असल्याचा पंचनामा केला व शेतकऱ्याला 9 ऑक्टोंबर च्या जलसमाधी आंदोलन मागे घेण्याचे विनंती केली मात्र सदर शेतकऱ्याने जोपर्यंत मला पिकाची नुकसान भरपाई व जमीन संपादित करून जमिनीचा मावेजा भेटत नाही जोपर्यंत मी माघार घेणार नसल्याचे सांगून अधिकाऱ्यांची विनंती अमान्य करून 9 ऑक्टोंबर ला कुटुंबासह जलसमाधी घेणारच असे पाटबंधारे विभागाचे अधिकाऱ्यांना ठणकावून सांगितले त्यामुळे पाटबंधारे विभागाचे अधिकारी हात हलवत परत गेले. दरम्यान यावेळी लघु पाटबंधारे विभागाचे सहाय्यक अभियंता प्रशांत वनगुजरे, टेक्निकल असिस्टंट एम. आर. निकाळजे, कानिष्ठ अभियंता डोंगरे आदींनी पाहणी करून रस्त्यावर पंचनामा केला.

## युवा सेनेच्या वतीने आयोजित दांडिया महोत्सवाचे बक्षिस वितरण

➤ माजलगाव : प्रतिनिधी

शहरामध्ये युवा सेनेच्या तर्फे नवरात्रोत्सवात मागील नऊ दिवसांपासून दांडिया महोत्सव उत्साहात झाला. यात महिला, मुली, मुले व तरुणाईने दांडिया खेळून रंगत आणली.

दि. २ गुरुवारी समारोपाच्या दिवशी बक्षीस वितरण झालं. यावेळी ब्राम्हण समाजाचे जिल्हाध्यक्ष अनंत शास्त्री, युवा सेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, अभय होके पाटील, सराफ असोसिएशनचे अध्यक्ष रामराजे रांजवण, उद्योजक जयदीप



शिंदे, अनिकेत रांजवण, दत्ता महाजन, बाळासाहेब झिंझुर्के, भागवत गाडेकर, लखन निसर्गगंध, सुमित साळवे, सच्चिदानंद आहेर, स्मिता लिमगावकर, राजेश्री सोळंके, योगिता भिसे यांची उपस्थिती होती. हा दांडिया कार्यक्रम तरुणाईला एकत्र आणणारा व महिलांना व्यासपीठ देणारा ठरला. आगामी काळात उत्साहानं आयोजन करू असे आयोजक अभिजीत कोंबडे यांनी सांगितले.

## लासुरला विहिरीत पडल्याने पाण्यात बुडून शेतकऱ्याचा मृत्यू

मध्ये जमीन आहे या जमिनीत असणाऱ्या विहिरीत पडल्याने पाण्यात बुडून शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान सदर घटनेची माहिती शिल्लेगाव पोलिसांनी अग्निक्षमन दलाला पाचारण केले त्यामुळे सकाळी सात वाजताच अग्निक्षमन दलाचे मुख्य अग्निक्षमन अधिकारी अशोक एन. खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपअग्निक्षमन केंद्रअधिकारी व्ही. बि. कदम, ड्युटी अधिकारी वैभव बाकडे, अग्निशामक जवान विनोद बम्हणे, रवि दुधे, सचिन फुले, वाहन चालक तुळशीराम सानप आदींनी घटनास्थळी दाखल होत गणेश खंडागळे या शेतकऱ्याचा मृतदेह विहिरीत शोधून काढला असता त्यास लासुर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्र दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्या तपासून मृत घोषित केले यावेळी शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक काळे, पोलीस कॉन्स्टेबल अर्जुन तायडे हेही घटनास्थळी उपस्थित होते.

## पोलीस कॉंस्टेबल स्वप्नील नरोडे यांची सिनेस्टाईल कामगिरी

पोलीस कॉन्स्टेबल स्वप्नील नरोडे यांनी तात्काळ समृद्धी महामार्गावरील सांगितलेल्या घटनास्थळ गाठत चोरी करत असलेल्या तिघा चोरट्यांना पकडले.

या चोरटयांच्या ताब्यातून लोखंडी अँगल, गॅस कटर, गॅस टाकी, वेल्डींग मशीन अन्य साहित्य जप्त करण्यात आले असून संबंधित चोरट्यांना अटक करून साहित्यासह पोलीस स्टेशन शिल्लेगाव येथे आणण्यात आले आहे. शिल्लेगाव पोलीसांनी आपल्या गुप्त बातमीदारांना कामाला लावले होते अशातच काल रात्री गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी जाऊन तीन चोरट्यांना एकट्या पोलीस हवालदार रवींद्र नरवाडे यांनी स्वत :चा जीव धोक्यात घालून पकडले कारण त्यांच्याकडे काही धारदार शस्त्रे सुद्धा होती त्यामुळे आपल्या जीवाची परवा न करता आपल्या कर्तव्याला प्राधान्य देऊन स्वत :चा जीव धोक्यात घालून तीन चोरट्यांना पकडण्यात नरवडे यांना यश आले इतर सहा ते सातजण गाडीसह पसार होण्यात यशस्वी झाले त्या गाडीचा क्रमांक एमएच २० जीसी– ४७४६ असल्याचे समजते परंतु हा क्रमांक खरा की खोटा हे तपासांती समजेल असे पोलीस निरीक्षक चाऊस यांनी सांगितले चोरी करतांना रंगेहाथ पकडलेले करण जारवाल, अर्जुन जारवाल, गितेश दिवेकर हे कसाबखेडा येथील असल्याचे पोलिसांनी सांगितले पोलीस कॉन्स्टेबल स्वप्नील नरवडे यांनी केलेल्य कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. वृत्त लिहीपर्यंत शिल्लेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती पुढील तपास पोलीस अधीक्षक डॉ. विनय कुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सलीम चाऊस व शिल्लेगाव पोलीस करत आहे या चोरटयांकडुन अनेक गुन्हे उघडकीस होण्याची शक्यता असल्याची माहिती पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी दैनिक वास्तव शी बोलतांना दिली.

## मोठीवडीत तीन नवनिर्वाचित डॉक्टरांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार

➤ माजलगाव : प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील गुणवंत विद्यार्थी डॉ. रेणुका महादेव खेत्री, डॉ. सचिन विष्णू खेत्री, डॉ. अक्षय लक्ष्मण खेत्री यांनी बी. एच. एम. एस. ही पदवी प्राप्त केली. याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा दि. ३ आक्टोंबर शुक्रवार रोजी सत्कार करण्यात आला. तालुक्यातील मोठेवाडी येथील संत सावता महाराज मंदिरात नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ खेत्री हे होते तर डॉ. रामेश्वर जंगले, माजी चेअरमण विश्वनाथ खेत्री, पत्रकार राजाभाऊ पास्टे, माजी सरपंच विष्णु



खेत्री, नाथाराव खेत्री, उपसरपंच अंगद खेत्री, भारत खेत्री, सुदर्शन हिवरकर, सुभाष सर्जे, विलास खेत्री, भगवान पवार, गजानन गोंडे, प्रभाकर खेत्री, चक्रधर हिवरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोमेश्वर हिवरकर यांनी तर आभार लक्ष्मण खेत्री यांनी मानले. मोठेवाडी येथील शेतकरी कुटुंबातील मुलांनी वैद्यकीय क्षेत्रातील पदवी संपादन केली, त्याबद्दल गावकऱ्यांनी त्यांचा नागरी सत्कार केला. या आयोजनात समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ खेत्री यांच्यासह गावकऱ्यांचा सहभाग होता, या सत्कार सोहळ्यात, गावकऱ्यांनी या गुणवंत विद्यार्थ्यांसोबत त्यांचे आई – वडील पालक यांच्यासह त्यांचा सत्कार करुन त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे कौतुक केले, आणि त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.